पदोन्नती च्या वेळी वेतन निश्चिती
करता विकल्प -
मुदत वाढ देणेबाबत -

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
निर्णय क्रमांक वेतन-१०८५/सीआर-१०९/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ ऑक्टोबर १९८५.

पहा:- [१] शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० [एक]/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४.
[२] शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० [दोन]/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४.

निर्णय:- वरील शासन निर्णयाव्दारे पदोन्नती नंतर आपल्या वेतनाची निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ मधील नियम ११[१][ए] खाली करुन घेण्यासंबंधीचा अथवा पदोन्नती नंतर ताबडतोब खालच्या पदावर वेतनवाढ देय झाल्यानंतर आपल्या वेतनाची पुनर्निश्चिती करुन घेण्यासंबंधीचा विकल्प शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आला होता. १ मे १९८१ किंवा नंतर आणि दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ पर्यन्त पदोन्नत झालेल्या सेवकांना जरुर तो विकल्प देण्यासाठी दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ पासून ३ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता व दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ नंतर पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता.

२. वरील शासन निर्णयातील वेतन निश्चिती संबंधीच्या तरतुदी व त्या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्याला द्यावा लागणारा विकल्प या बाबी कर्मचाऱ्याच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. परंतु शासनाच्या आला असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी वरील शासन निर्णयातील तरतुदी आपल्या अधिकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीस वेळेवर न आणल्यामुळे तसेच या तरतुदींचा सखोल अभ्यास न केल्यामुळे बरेचसे कर्मचारी पदोन्नती नंतर द्यावा लागणारा आपला विकल्प निर्धारित मुदतीमध्ये देऊ शकले नाहीत. तसेच काही कर्मचाऱ्यांनी आपला विकल्प मुदत टळून गेल्यानंतर दिला. विकल्प देण्यापासून वंचित राहिल्यामुळे तसेच निर्धारित कालमर्यादेनंतर दिलेला विकल्प स्वीकृत होत नसल्यामुळे, इच्छित वेतन निश्चितीच्या अभावी होणारे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने विकल्प देण्याची मुदत वाढवून देण्यासंबंधीची किंवा निर्धारित कालमर्यादेनंतर दिलेला विकल्प स्वीकारण्यास मंजुरी देण्यासंबंधीची बरीचशी प्रकरणे या विभागाकडे येऊ लागली. या सर्व गोष्टींचा विचार करुन तसेच इच्छित वेतन निश्चितीच्या अभावी संबंधित कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतर आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११००[एक]/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ नुसार वेतन निश्चितीच्या संदर्भात द्याव्या लागणाऱ्या विकल्पाची मुदत हे आदेश काढल्याच्या दिनांकापासून आणखी तीन महिन्यांनी वाढवून देण्याचे आदेश या निर्णयाव्दारे देण्यात येत आहेत. ज्या कर्मचाऱ्यांनी आपला विकल्प अजून दिलेला नाही किंवा ज्यांनी आपला विकल्प निर्धारित मुदतीनंतर दिलेला आहे, परंतु स्वीकृत झालेला नाही अशा सर्व कर्मचाऱ्यांनी आता हे आदेश निघाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आपला विकल्प द्यावा. यानंतर मात्र, कोणत्याही परिस्थितीत विकल्प देण्याची मुदत वाढवून मिळणार नाही. सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येत आहे की,

वेतन निश्चितीच्या तरतुदी आपल्या अधिकार क्षेत्रातील ज्यांना ह्याप्रमाणे विकल्प देता येतो अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या नजरेस ताबडतोब आणाव्यात.

३. या आदेशान्वये असेही निर्देशित करण्यात येत आहे की, यापुढे ज्यांना याप्रमाणे वेतन निश्चिती संबंधीचा विकल्प देता येतो अशा कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश काढताना त्या आदेशांमध्ये, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११००[एक]/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ अनुसार पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्याने वेतन निश्चिती संबंधीचा आपला विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास, वेतन निश्चिती सरळ, महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ मधील नियम ११[१][ए] खाली केली जाईल, असा आणखी एक परिच्छेद न चुकता घालावा.

४. ज्या राजपत्रित अधिकाऱ्यांनी दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ च्या आदेशांनुसार आपला विकल्प या अगोदरच दिला आहे, परंतु तो विहीत मुदतीत नसल्याने ज्यावर अधिदान व लेखा अधिकारी, महालेखापाल[लेखा व अनुज्ञेयता]मुंबई व महालेखापाल[लेखा व अनुज्ञेयता], नागपूर यांना वेतन निश्चिती करता आलेली नाही अशा सर्व विकल्पांवर आता वरील लेखा अधिकाऱ्यांनी वेतन निश्चितीची कारवाई करावी. याकरिता पदोन्नत झालेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांनी परत विकल्प भरून देण्याची आवश्यकता नाही, परंतु जेथे अशा राजपत्रित अधिकाऱ्यांना विकल्प मुदतीत नव्हता असे कळविण्यात आले होते अशा अधिकाऱ्यांनी मात्र आपला विकल्प परत पाठवावा.

3919

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ए. पां. जाधव,
कार्यासन अधिकारी.

प्रति

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
×प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
×प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
×सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
×सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
×प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-३.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
--कार्यालय--
शाखा - AB

×पत्राद्वारे.

१९८५ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.